विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

### पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६: भाजपा जालना निवासी प्रशिक्षण वर्गाचा उत्साहात समारोप

# कार्यकर्ताच भारतीय जनता पक्षाची खरी ताकद; विचार, संघटन व सेवाभावातून राष्ट्रनिर्मिती शक्य आ. बबनराव लोणीकर

**जालना | प्रतिनिधी -** भारतीय जनता पक्ष जालना महानगर व ग्रामीण जालना जिल्ह्याच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६ चा समारोप अत्यंत उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. दि. १६ मे आणि १७ मे रोजी आयोजित करण्यात आलेल्या या निवासी प्रशिक्षण वर्गात कार्यकर्त्यांना पक्ष विचारसरणी, संघटन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे देण्यात आले.

समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. ''भारतीय जनता पक्ष हा केवळ राजकीय पक्ष नसून ती एक विचारधारा आहे. सामान्य कार्यकर्त्यांचे कष्ट, अथांग परिश्रम, संघटनशक्ती आणि निस्वार्थी सेवाभावाच्या जोरावरच आज भाजप जगातील सर्वात मोठा पक्ष बनला आहे. राष्ट्र प्रथम ही भावना मनात ठेवून काम करणारा प्रत्येक कार्यकर्ता देशाच्या राष्ट्रनिर्मितीत आपले मोलाचे योगदान देत आहे,'' असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या विचारांची प्रासंगिकता अधोरेखित करताना आ. लोणीकर म्हणाले की, ''त्यांनी मांडलेला एकात्म मानववाद आणि अंत्योदय हा विचार आजही देशाला दिशा देणारा ठरत आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास आणि सेवा पोहोचवणे हेच प्रत्येक कार्यकर्त्याचे अंतिम ध्येय असायला हवे.''

दोन दिवसीय सत्रात विविध विषयांवर दिग्गज नेत्यांचे सखोल मार्गदर्शन

या दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण वर्गात एकूण विविध अभ्यासपूर्ण सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पक्षाचे वरिष्ठ नेते आणि मार्गदर्शकांनी कार्यकर्त्यांना पुढीलप्रमाणे सखोल मार्गदर्शन केले:

पक्षाचा इतिहास व विकास: माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी भाजपच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या दैदिप्यमान प्रवासावर प्रकाश टाकला.

कार्यकर्ता विकास, सांभाळ व दायित्व बोध: श्री. सुनील राणे यांनी कार्यकर्त्यांची जडणघडण आणि पक्षातील जबाबदाऱ्यांबाबत मार्गदर्शन केले.

देशापुढील आव्हाने आणि निदानाचा आमचा प्रयत्न: माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी देशासमोरील सद्य आव्हाने आणि सरकारचे प्रयत्न यावर सविस्तर भाष्य केले.

बूथ व्यवस्थापन, मन की बात व आयटी कार्यक्रम: श्री. संजय केनेकर यांनी निवडणुकीतील सर्वात महत्त्वाचा घटक असलेल्या बूथ रचना आणि तंत्रज्ञानाची जोड याविषयी माहिती दिली.

पक्षाची कार्यपद्धती व विचार परिवार: श्री. किशोर शितोळे आणि श्री. विलास दहिभाते यांनी पक्षाची शिस्त, कार्यपद्धती आणि वैचारिक परिवाराची व्याप्ती समजावून सांगितली.

वैचारिक अधिष्ठान व प्रत्यक्ष कार्यानुभव: श्री. सुरेश केसापूरकर आणि आ. नारायण कुचे यांनी कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष मैदानात काम करताना येणारे अनुभव आणि वैचारिक बांधिलकी यावर मार्गदर्शन केले.

मोदी सरकारचे गरीब कल्याणाचे उपक्रम: कैलाश गोरंट्याल यांनी केंद्र सरकारच्या लोककल्याणकारी योजना तळागाळातील लोकांपर्यंत कशा पोहोचवाव्यात, याचे तंत्र सांगितले.



कार्य विस्तार: खा. डॉ. अजित गोपछडे यांनी पक्षाचा विस्तार आणि नवनवीन घटकांना पक्षाशी जोडण्याबाबत दिशा दिली.

सोशल मीडिया, नवीन तंत्रज्ञान () व नमो-सरल ॲप: तेजस मालविया यांनी आधुनिक काळाची गरज ओळखून कृत्रिम बुद्धिमत्ता (), सोशल मीडियाचा प्रभावी वापर आणि नमो व सरल ॲपच्या माध्यमातून जनसंपर्क कसा वाढवावा, याचे विशेष प्रशिक्षण दिले.

दिग्गजांची उपस्थिती आणि कार्यकर्त्यांचा

या प्रशिक्षण वर्गाच्या समारोप प्रसंगी व्यासपीठावर माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे, आ. संतोष पाटील दानवे, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत यांच्यासह सर्व नगरसेवक, जिल्हा पदाधिकारी आणि जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गामुळे जालना जिल्ह्यातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये एक नवे चैतन्य आणि ऊर्जा निर्माण झाली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत, जनसंपर्क अधिक प्रभावी करून आगामी काळातील सर्व आव्हानांना सामोरे जाण्याचा आणि पक्ष संघटन तळागाळापर्यंत अधिक मजबूत करण्याचा ठाम निर्धार या निमित्ताने कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भाजपा महानगर व ग्रामीण जिल्हा पदाधिकारी, विविध आघाड्यांचे प्रमुख, संयोजक आणि कार्यकर्त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. धन्यवाद प्रस्तावाने आणि वंदे मातरम् च्या घोषात या यशस्वी प्रशिक्षण वर्गाची सांगता झाली.

---

# जुन्या जालन्यातील ३ हातभट्ट्यांवर छापे, २ लाख २१ हजारांचा मुद्देमाल जप्त

### कदीम जालना पोलिसांची मोठी कारवाई



**जालना | प्रतिनिधी -** शहरातील अवैध धंद्यांविरुद्ध कदीम जालना पोलिसांनी रविवारी (दि. १७ मे २०२६) सकाळीच मोठी धडक कारवाई केली. जुना जालना भागातील संजय नगर, नुतन वसाहत आणि कैकाडी मोहल्ला या तीन वेगवेगळ्या ठिकाणी अनधिकृतपणे सुरू असलेल्या गावठी हातभट्टीच्या दारू अड्ड्यांवर पोलिसांनी एकाच वेळी छापे टाकले. या कारवाईत पोलिसांनी तब्बल २ लाख २१ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून दारू बनवण्याचे रसायन जागीच नष्ट केले आहे.

गुप्त बातमीदाराच्या माहितीवरून दोन पथके रवाना

१७ मे रोजी सकाळी १०:०० वाजताच्या सुमारास कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. जे. व्ही. शेवाळे यांना गुप्त बातमीदाराकडून खात्रीलायक माहिती मिळाली की, संजयनगर, नुतन वसाहत आणि कैकाडी मोहल्ला (जुना जालना) या परिसरात काही इसम अवैधरीत्या गावठी हातभट्टीची दारू तयार करून तिची मोठ्या प्रमाणावर विक्री करत आहेत.

माहिती मिळताच पोलीस निरीक्षकांनी वेळ न घालवता तातडीने दोन विशेष पथके तयार केली आणि संबंधित ठिकाणी छापा टाकण्याचे आदेश दिले.

असा मिळाला मुद्देमाल (एकूण किंमत: २,२१,८०० रुपये):

पोलिसांच्या पान २ वर

---

### जालन्यात बनावट व अनधिकृत खतांचा महाघोटाळा उघड!

# कृषी विभागाच्या धडक कारवाईने १८ लाखांचा साठा जप्त

### नांदेडच्या बिलावर जालन्यात काळाबाजार; जयभारत एग्रोसह तिघांवर गुन्हा, शेतकरी फसवणुकीच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश

**जालना | प्रतिनिधी -** मृग नक्षत्र आणि आगामी खरीप हंगामाच्या तोंडावर जालन्यात शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या एका मोठ्या आंतरजिल्हा खत माफिया रॅकेटचा कृषी विभागाच्या भरारी पथकाने पर्दाफाश केला आहे. शहरातील नवीन मोंढा भागात धाड टाकून पथकाने तब्बल १ हजार ७६२ खताच्या गोण्या आणि सुमारे १८ लाख ७ हजार १८४ रुपयांचा संशयित, अनधिकृत खतसाठा जप्त केला आहे. या प्रकरणी रविवारी (दि. १७ मे २०२६) जालन्यातील चंदनझिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याने संपूर्ण जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

गोपनीय माहितीवरून एपीएमसीच्या गाळ्यात धाड

विभागीय व जिल्हा कृषी भरारी पथकाला एक अत्यंत गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पथकाने १५ मे रोजी नवीन मोंढा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या () गाळा क्रमांक एस.टी.-२६ येथे अचानक धाड टाकली. यावेळी तेथे एक ट्रक (क्रमांक २३ २४००) उभा होता आणि त्यामधून मोठ्या प्रमाणावर खताच्या गोण्या गोदामात उतरविल्या जात असल्याचे पथकाला रंगेहात दिसून आले.

१२ प्रकारची रासायनिक व सेंद्रिय खते जप्त

भरारी पथकाने केलेल्या तपासणीत गोदामामध्ये आणि ट्रकमध्ये विविध नामांकित कंपन्यांच्या खतांचा साठा आढळून आला. यामध्ये प्रामुख्याने:

EFFCO PDM Potash
DAP (डीएपी)
Neem Coated Urea (कडुलिंब लेपित युरिया)
Zinc Biofertilizer
Organic Manure (सेंद्रिय खत)
PROM व Diatomite Silicon

या वेगवेगळ्या १२ प्रकारच्या एकूण १७६२ गोण्या जप्त करण्यात आल्या असून, त्याची शासकीय किंमत १८ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे.

नांदेडचे बिल अन् जालन्यात अनधिकृत साठा; असा झाला गैरव्यवहार

कृषी अधिकाऱ्यांनी जेव्हा ट्रकमधील मालाच्या बिलांची तपासणी केली, तेव्हा एक धक्कादायक बाब समोर आली. या बिलांनुसार, हा संपूर्ण खताचा माल नांदेड येथील 'EFFCO Fertilizers' कडे विक्री दाखवून तेथे पाठवण्यात येत होता. मात्र, प्रत्यक्षात हा माल नांदेडला न जाता जालन्यातील जयभारत एग्रो



ट्रेडर्स च्या अनधिकृत गोदामात उतरवला जात होता.

विशेष म्हणजे, जयभारत एग्रो ट्रेडर्सकडे असलेल्या खत विक्री परवान्यामध्ये या संबंधित गाळ्याचा किंवा गोदामाचा उल्लेखच नव्हता. याबाबत गोदामाचे प्रोप्रायटर आकाश प्रमोदसिंग बायस यांच्याकडे परवान्याबाबत विचारणा केली असता, त्यांना कोणताही कायदेशीर व समाधानकारक खुलासा देता आला नाही.

भोकरदनच्या हसनाबाद प्रकरणाशी कनेक्शन; री-पॅकिंगचा संशय

कृषी विभागाच्या प्राथमिक चौकशीत पान २ वर

---

# जालन्यात ऑनलाईन तलवार मागवून दहशत माजवणारा युवक जेरबंद; कदीम जालना पोलिसांची धडक कारवाई

### शिवनगर परिसरातून तलवार, खंजीर व धारदार चाकू जप्त; १८ वर्षीय तरुणाविरुद्ध भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल

**जालना | प्रतिनिधी -** शहरात अवैधरित्या धारदार घातक शस्त्रे बाळगून सर्वसामान्य नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तीविरुद्ध कदीम जालना पोलिसांनी पुन्हा एकदा कडक पाऊल उचलले आहे. ऑनलाईन शॉपिंग साईटवरून धोकादायक तलवार आणि खंजीर मागवून परिसरात भाईगिरी करणाऱ्या एका १८ वर्षीय युवकाला कदीम जालना पोलिसांनी शिवनगर परिसरातून रंगेहात अटक केली आहे. पोलिसांनी त्याच्याकडून तलवार, खंजीर आणि चाकू असा एकूण ८ हजार ५०० रुपयांचा घातक शस्त्रसाठा जप्त केला आहे.

रात्रीच्या गस्तीदरम्यान पोलिसांना मिळाली गुप्त माहिती

सध्या आगामी सण-उत्सव आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने कदीम जालना पोलिसांचे पथक हद्दीमध्ये रात्रीची विशेष गस्त (पेट्रोलिंग) घालत आहे. दिनांक १५ मे २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास हे पथक गस्तीवर असताना, पोलीस पथकाला एका विश्वासू गुप्त बातमीदाराकडून अत्यंत महत्त्वाची माहिती मिळाली. जुन्या जालन्यातील शिवनगर भागात एक तरुण हातामध्ये व कमरेला धारदार आणि लांबलचक तलवार तसेच खंजीर बाळगून फिरत असून, तो येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना घाबरवून परिसरात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे.

सापळा रचून आवळल्या मुसक्या; शर्टाच्या मागे लपवले होते हत्यार

माहिती मिळताच कदीम जालना पोलीस ठाण्याच्या विशेष शोध पथकाने वेळ न घालवता शिवनगर परिसरात धाव घेतली. पोलिसांनी अत्यंत गोपनियतेने पान २ वर



### जालना मर्चंट बँक घोटाळा:

# ३ ब्रँच मॅनेजर जेरबंद; घोटाळ्याचा आकडा आता ५३ कोटींवर!

**जालना | प्रतिनिधी -** सहकार क्षेत्रात आणि बँकिंग वर्तुळात प्रचंड खळबळ उडवून देणाऱ्या जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक घोटाळा प्रकरणात जालना पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने () अत्यंत धडक कारवाई केली आहे. बँकेच्या तीन वेगवेगळ्या शाखांमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांना (ब्रँच मॅनेजर्स आणि पासिंग ऑफिसर) पोलिसांनी अटक केली असून, त्यामुळे या घोटाळ्यातील एकूण अटक आरोपींची संख्या आता १२ वर पोहोचली आहे. विशेष म्हणजे, सुरुवातीला २३ कोटी रुपयांचा वाटणारा हा घोटाळा आता तब्बल ५३ कोटी २४ लाख ४९ हजार ८४९ रुपयांवर पोहोचल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

तपास चंदनझिरा पोलिसांकडून आर्थिक गुन्हे शाखेकडे

बनावट कागदपत्रांच्या आधारे वेअर हाऊसच्या नावावर १७७ बनावट खातेदार तयार करून जालना मर्चंट बँकेची २३ कोटी ३३ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी सुरुवातीला चंदनझिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाण्यात गु.र.नं. २२०/२२६ अन्वये भारतीय न्याय संहिता () २०२३ मधील कलम ३१६(५), ३१६(२), ३१८(४), ३३६(३), ३३८, ३४०(२), ६१(२), ३(५) सह एमपीआयडी ( एक्ट) च्या कलम ३, ४, ५ नुसार गुन्हा नोंद आहे.

परंतु, अपहाराची व्याप्ती आणि रक्कमेचा अवाढव्य आकडा पाहता, जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. तेगबीर सिंह संधू यांनी या प्रकरणाचा सखोल तपास थेट आर्थिक गुन्हे शाखेकडे () वर्ग करण्याचे आदेश दिले होते.

सीईओ () यांच्या जबाबानंतर घोटाळ्याचा आकडा दुप्पट!

आर्थिक गुन्हे शाखेने या तपासाची चक्रे वेगाने फिरवली. तपासादरम्यान बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी () श्री. कांचन अनिल केळकर यांचा सविस्तर जबाब नोंदवण्यात पान २ वर

संपादकीय पान

## सत्ता, कायदा आणि 'विशेष सवलती'चा प्रश्न

जालना महानगरपालिकेच्या पहिल्या महापौर म्हणून वंदनाताई मगरे यांची निवड हा शहरासाठी ऐतिहासिक क्षण आहे. महिला नेतृत्वाला मिळालेला हा सन्मान नक्कीच स्वागतार्ह आहे. मात्र, लोकशाहीत पद जितके मोठे असते, तितकी जबाबदारीही अधिक मोठी असते. आज महापौरांच्या वाहनावर अधिकृत नंबर प्लेट नसल्याचा मुद्दा समोर आल्यानंतर हा विषय केवळ एका गाडीपुरता मर्यादित राहिलेला नाही; तर तो ''कायदा सर्वांसाठी समान आहे का?'' या मूलभूत प्रश्नाशी जोडला गेला आहे. सामान्य नागरिकाने नंबर प्लेटशिवाय वाहन चालवले, फॅन्सी नंबर लावला किंवा नियम मोडला तर वाहतूक पोलीस क्षणाचाही विलंब न लावता दंड आकारतात. अनेकदा वाहने जप्त होतात, ई-चलान घरी पोहोचतात, सार्वजनिक मोहिमा राबवल्या जातात. नुकतेच बुलेटच्या मॉडफिाइड सायलेन्सरवर बुलडोझर चालवून प्रशासनाने कायद्याचा धाक दाखवला. मग हाच धाक लोकप्रतिनिधींच्या वाहनांसमोर का मावळतो? हा प्रश्न केवळ विरोधकांचा नाही, तर सामान्य करदात्या नागरिकाचा आहे. लोकशाहीत लोकप्रतिनिधी हे कायद्यापेक्षा मोठे नसतात. उलट तेच कायद्याचे पहिले पालनकर्ते असायला हवेत. महापौर हे शहराचे ''प्रथम नागरिक'' मानले जातात. त्यामुळे त्यांच्या वाहनावर नंबर प्लेट नसणे ही केवळ तांत्रिक चूक नसून चुकीचा सामाजिक संदेश देणारी बाब आहे. ''आमच्यासाठी वेगळे नियम आणि जनतेसाठी वेगळे'' अशी भावना निर्माण होणे हे कोणत्याही प्रशासनासाठी धोकादायक आहे. यातील अधिक गंभीर बाब म्हणजे प्रशासनाची भूमिका. जालना शहरात वाहतूक पोलिसांचे जाळे, सीसीटीव्ही कॅमेरे आणि आरटीओची तपासणी मोहीम सतत सुरू असते. मग इतक्या महत्त्वाच्या पदावरील व्यक्तीचे वाहन नंबरशिवाय फिरत असताना संबंधित यंत्रणांना ते दिसले नाही का? की दिसूनही दुर्लक्ष केले गेले? जर सामान्य नागरिकावर तत्पर कारवाई होते आणि व्हीआयपी वाहनांकडे मूकसंमतीने पाहिले जाते, तर ही केवळ निष्क्रियता नाही तर व्यवस्थेतील दुहेरी निकषांची कबुली ठरते. कायद्याचे राज्य हे निवडक नसते. ते सर्वांसाठी सारखे असले पाहिजे. अन्यथा जनतेचा कायद्यावरील विश्वास ढासळतो. पोलीस आणि आरटीओ प्रशासनाने या प्रकरणात राजकीय दबावापलीकडे जाऊन वस्तुनिष्ठ भूमिका घेणे आवश्यक आहे. वाहनाला तात्काळ अधिकृत नंबर प्लेट लावणे, नियमांचे पालन सुनिश्चित करणे आणि आवश्यक असल्यास दंडात्मक कारवाई करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. या घटनेतून आणखी एक वास्तव समोर येते आपल्या व्यवस्थेत अजूनही ''व्हीआयपी संस्कृती'' पूर्णपणे संपलेली नाही. लाल पाट्या, पदाचे फलक आणि विशेष वागणूक यांमधून काही जण स्वतःला कायद्याच्या चौकटीबाहेर समजू लागतात. पण भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार दिला आहे. रस्त्यावर वाहन चालवताना महापौर असो किंवा सामान्य नागरिक, नियम एकच असायला हवा. आज जालनेकर प्रशासनाकडे केवळ कारवाईची अपेक्षा करत नाहीत, तर एक संदेश मागत आहेत ''कायदा खरोखरच सर्वांसाठी समान आहे'' हा संदेश. कारण लोकशाहीत कायद्याचा सन्मान हा पदामुळे नाही, तर पालनामुळे टिकून राहतो.

# मोबाईलने बालपण हिरावून;मानवी दिनचर्येवर घणाघाती प्रहार केला

आपण म्हणतो बालपण देगा देवा!परंतु आज आपले बालपण मोबाईल हिरावून घेत आहे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. स्मार्टफोन दिवसेंदिवस छोट्या-छोट्या बालकांसाठी व युवावर्गांसाठी घातक सिध्द होत.त्याचप्रमाणे शाळांमध्ये सुध्दा विद्यार्थीवर्ग मोबाईलचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहे व यांचे दुष्परिणाम हळूहळू सामोरं येतांना दिसत आहे.एक वर्षांवरील मुलं रडतात म्हणून आई-वडील मुलांच्या हातात मोबाईल देवुन आपली सुटका करून घेतात.याचेही दुष्परिणाम हळूहळू समोर येतांना दिसत आहे.ही परिस्थिती फक्त भारतातच नाही तर संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळते.यामुळे जगातील संपूर्ण शाळांनी मोबाईलवर बंदी आणावी असा सुचक सल्ला युनेस्कोने दिला आहे.देशासह जगात डिजिटल क्रांती झाली अवश्य परंतु त्याचा गैरवापर विद्यार्थांच्या व युवकांच्या अंगाशी येतांना दिसत आहे.सोबतच बालवयात आई-वडील मुलांना मोबाइलच्या आहारी टाकतांना दिसतात.स्मार्टफोनमुळे सामाजिक, व्यवहारीक व इतर क्षेत्रात आमूलाग्र बदल झाल्याचे आपल्याला दिसुन येते.आज मोबाईलच्या अतिवापरामुळे कोणीही कोणासोबत समक्ष बोलायला तयार नाही,घरात सर्वसाधारण चर्चा करायला तयार नाही, कोणत्याही गोष्टीची बोलण्यातून देवाणघेवाण किंवा आदानप्रदान होत नाही कारण एक वर्षांच्या मुलांपासून ते मोठ्या पर्यंत सर्वच घंटो-न-घंटे मोबाईलमध्ये व्यस्त असतात. पालक आपल्या जबाबदारीपासुन पळ काढण्यासाठी व अतिलाडामुळे चिमुकले सुध्दा मोबाईलच्या आहारी गेले आहेत.यामुळे मानसिक आजार वाढण्याची दाट शक्यता आहे आणि वाढत आहे. मोबाईलच्या गेममध्ये युवावर्ग दिवसेंदिवस फसतांना दिसत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे भारतात युवावर्ग मोठ्या प्रमाणात मोबाईलच्या आदिन झालेले आहेत. यामुळे त्यांना अनेक व्याधींचा सामना करावा लागतो आहे. शिक्षण क्षेत्रातील डिजिटल क्रांती विद्यार्थांसाठी चिंताजनक असल्याचे मत युनेस्कोच्या अहवालातून समोर आले आहे.मोबाईलचा अतिरिक्त वापर झाल्याने शैक्षणिक कामगिरी मंदावते.स्क्रीन टाईम वाढल्याने मुलांच्या भावनिक स्थिरतेवर नकारात्मक परिणाम होतो.परिणामी,मुले चिडचिडे व रागीट बनतात असेही युनेस्कोने म्हटले आहे.यामुळे मुलांमधील फिजिकल एक्टिविटी दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात कमी होतांना दिसत आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.देशात ७४ टक्के मुले (११ ते १७ वयोगटातील) रोज ३० मिनीटेही मैदानी खेळ खेळत नाही. त्याचप्रमाणे १६ ते ३४ वयोगटातील ५९ टक्के लोक ऑनलाईन खेळ ३-३ तास खेळण्यात मग्न असतात. म्हणजेच आजची युवा पिढी मोबाईलच्या खेळांमध्ये (गेममध्ये) किंवा सिरीयल पहाण्यात मोठ्या प्रमाणात मग्न असल्याचे स्पष्ट दिसून येते.यामुळे शरीराला आवश्यकतेनुसार पाहिजे तेवढा व्यायाम मिळत नाही.डब्लुएचओच्या रिपोर्ट नुसार भारतात ११ ते १७ वयोगटातील ७४ टक्के मुले फिजीकल एक्टिव्ह नसल्याचे सांगितले जात आहे.म्हणजेच एका आठवड्यात मुलं १५० मिनिटसुध्दा खेळत नाही किंवा शारीरिक हालचाली ज्या पध्दतीने पाहिजेत त्या पध्दतीने दिसून येत नाही.यावरून स्पष्ट होते की आजचा विद्यार्थीवर्ग व युवावर्ग दिवसेंदिवस डोक्यानी कीतीही हुशार असेल परंतु शारीरिक दृष्ट्या दिवसेंदिवस खालावत असल्याचे दिसून येते. देशातील ४१ टक्के लोक मोबाईलच्या नादामुळे शारीरिक व्यायामाच्या दृष्टीकोनातून एक्टिव नसल्याचे दिसून येते.म्हणजे आज बालपणापासुन तर युवा वर्गापर्यंत आणि युवावर्गापासुन तर वयस्कर लोकांना सुद्धा मोबाईलने चांगलेच जखडल्याचे आपण पहातो.यामुळे शरिराला ज्या पध्दतीने आणि ज्याप्रमाणात व्यायामाची आवश्यकता आणि गरज आहे तो मिळत नसल्याने अनेक व्याधी किंवा आजार बालकांमध्ये, युवावर्गामध्ये व अन्य लोकांमध्ये दिसून येते व यांचा परिणाम आरोग्यावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होत आहे.आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात मोबाईल शिवाय जिवन अधुरे असल्याचे सर्वांना वाटते. परंतु मोबाईलचा वापर दिवसेंदिवस मानवाच्या दृष्टीकोनातून अत्यंत घातक सिद्ध होत आहे हेही तितकेच सत्य आहे याला कोणीही



नाकारू शकत नाही.म्हणजेच मोबाईलचा अती वापर जीव घेणा सीध्द होवू शकते यालाही नाकारता येत नाही.मानवाच्या मेंदूला (मस्तिष्कला) रक्तपुरवठा व्यवस्थित आणि सुरळीत झाला नाही तर (स्ट्रोक)होण्याचे मोठे कारण ठरू शकते.स्ट्रोक म्हणजे पॅरालिसीसचा ॲटॅक अथवा लकवा किंवा ब्रेन ॲटॅक असेही म्हणतात.देशात स्ट्रोकच्या आजाराचे जवळपास ६५ लाख रूग्ण असल्याचे सांगितले जाते.म्हणजेच आजच्या घडीला मोबाईलच्या अती वापरामुळे मानवजाती अत्यंत धोकादायक स्थितीत आल्याचे समजते.ही बाब स्पष्ट होते की मोबाईलच्या अती वापरामुळे लठ्ठपणा, शुगर (मधुमेह), डोळ्यांचा आजार ,मानेचा त्रास, मानसिक त्रास,हार्टच्या आजारासह अनेक आजार मानवाच्या शरिरात घर करीत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे शरीरातील अवयवांना पाहिजे त्याप्रमाणात व्यायाम मिळतच नाही.त्यामुळे ही कठीण परिस्थिती उध्दभवत आहे. मानवाला मोबाईलमुळे जेवढा आनंद मिळतो त्यापेक्षा जास्त धोका मोबाईलमुळे होणाऱ्या आजारामुळे निर्माण होत आहे. त्यामुळे मोबाईलचा वापर कमीत कमी कसा करता येईल व आपल्याला शारीरिक दृष्ट्या कोणताही धोका निर्माण होणार नाही यापध्दतीने मोबाईलचा वापर व्हायला हवा.''अमेरिकन ॲकेडमी ऑफ पीडियाट्रिक्स या संस्थेने एका संशोधनात म्हटले आहे की दोन ते चार वर्षांच्या मुलांनी दिवसातून फार तर एक तास फोन वापरणे योग्य असल्याचे संशोधनात म्हटले आहे. चार वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुलांनी दररोज दोन तास मोबाईल वापरणे योग्य आहे.यापेक्षा जास्त मोबाईल वापरल्यास डोळ्यासोबतच मानसिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो यानंतर यांचे भयंकर परिणाम भोगावे लागू शकतात.आपण काय करायचं आणि काय करू नये हे आपणच ठरवू शकतो व धोकादायक वस्तू पासून दुर राहु शकतो.आज आपण पहातो ३ ते २० वर्षे वयोगटातील मुले-मुली टीव्ही पहाताना,जेवतांना मोबाईलला चीपकुन रहातात. जनुकाय मोबाईल बीना जिवन अधुरे आहे की काय अशी परिस्थिती दिसून येते.याचा दुष्परिणाम पुढेचालुन भयानक होवू शकतो.छोटे मुलं रडायला लागले की आई-वडिल त्यांच्या हातात मोबाईल देऊन मोकळे होतात परंतु हे घातक आहे. त्यामुळे पालकांना आग्रहाची विनंती करतो की मुलांना मोबाइल पासून जितके दुर ठेवता येईल तितके दुर ठेवलेच पाहिजे. यामुळे मुलांना फिजिकल एक्टीव्हीटी किंवा व्यायाम करण्यास मदत होईल.मोबाईलचा अती वापर शरिराला घातक आहेच त्याचबरोबर त्याचा गैरवापर केला तर जीवाला सुध्दा धोका निर्माण होऊ शकतो आणि होत आहे. आजही लोक वाहन चालवितांणा मोबाईलवर बोलत रहातात यामुळे अनेक दुर्घटना झाल्याचे आपण पहातो आणि यामुळे देशात मोठ्या प्रमाणात जीवीत हाणी सुध्दा झाल्या आहेत. मोबाइल वापरायला हरकत नाही.परंतु त्याचा योग्यवेळी आणि कमीत कमी वापर व्हायला पाहिजे. अन्याथा मोबाईलमुळे जेवढे सुख आणि आनंद मिळतो.त्यापेक्षा हजारो पटीने आपल्याला यातना किंवा दु:ख भोगाव्या लागतील हेही तितकेच सत्य आहे. त्यामुळे मुलांनी मोबाईल हातात घेण्यापेक्षा पुस्तक, वर्तमानपत्र हातात घेतले तर बुध्दीचा विकास झपाट्याने होईल व पुस्तकी ज्ञानामुळे शरिराच्या विकासाला मोठी चालना मिळेल. आपण एकंदरीत विचार केला तर मोबाईल युगामुळे देशातील मातीतील छोटे-छोटे खेळ नामशेष झाले किंवा होण्याच्या मार्गावर आहेत.त्यामुळे अनेक आजारांचा सामना करावा लागतो आहे.आजच्या युवापिढीला जुने खेळ काय होते ते सुद्धा माहिती नाही आणि या संपूर्ण गोष्टी मोबाईलमुळे उध्दभवतांना दिसते. म्हणजेच आजचे मोबाईल युग बालकांसाठी,युवा वर्गासाठी किंवा विद्यार्थांना शारीरीक दृष्ट्या अपंग करीत असल्याचे दिसून येते.यावरून असे लक्षात येते की वर्चुअल खेळांमुळे रियल खेळ हळूहळू नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. आज मोबाईलची दुनिया पहाता असे वाटते ''कहा गये ओ दिन''

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

पान १ वरुन

## जुन्या जालन्यातील ...

दोन्ही पथकांनी संजय नगर, नुतन वसाहत आणि कैकाडी मोहल्ल्यात एकाच वेळी धाडी टाकल्या. यावेळी आरोपींच्या ताब्यातून खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला:
हातभट्टीचे रसायन: २,१०० लीटर (किंमत रु. १,८९,०००/-)
तयार गावठी दारू: २८० लीटर (किंमत रु. २८,०००/-)
देशी दारू: १० सीलबंद बाटल्या (किंमत रु. ८००/-)
इतर साहित्य: दारू गाळण्यासाठी लागणारे साहित्य (किंमत रु. ४,०००/-)
जागीच केला नाश:
जप्त केलेल्या मुद्देमालापैकी केमिकल ॲनालिसिस (..) साठी आवश्यक ते नमुने ठेवून घेऊन, उर्वरित रसायन व गावठी दारू अत्यंत नाशवंत असल्याने पोलिसांनी कायदेशीर प्रक्रियेनुसार ती जागीच नष्ट केली.
पुन्हा गुन्हे करणाऱ्यांवर एमपीडीए () ची टांगती तलवार!
कदीम जालना पोलीस ठाण्याच्या हद्दीत जे गुन्हेगार वारंवार गावठी हातभट्टी दारू तयार करणे आणि विकणे यांसारखे अवैध धंदे करत आहेत, अशा सराईत गुन्हेगारांची यादी पोलीस तयार करत आहेत. अशा समाजकंटकांवर थेट एम.पी.डी.ए. (झोपडपट्टी गुंड प्रतिबंधक कायदा) अंतर्गत कडक कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या इशाऱ्यामुळे अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले आहेत.
या पोलीस पथकाने केली कारवाई:
सदरची धडक कारवाई जालना जिल्ह्याचे माननीय पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधु साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी जालना आणि कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. जे. व्ही. शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.
या कारवाईत सपोनि/अमित म्हस्के, पोउपनि/डी.एस. मोरे, पोलीस अंमलदार कैलास जायभाये, किरण चेके, बलराम जारवाल, अशपाक शहा, रामेश्वर राऊत, आदर्श गायकवाड आणि सदाशिव मुटकुळे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. पोलिसांच्या या कामगिरीबद्दल शहरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे.

## कृषी विभागाच्या ...

या घोटाळ्याची पाळेमुळे अधिक खोल असल्याचे समोर आले आहे. या गोदामात सापडलेल्या खतांचा काही तपशील यापूर्वी भोकरदन तालुक्यातील हसनाबाद पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या खत गैरव्यवहार प्रकरणाशी जुळणारा आहे. त्यामुळे शासकीय अनुदानातील युरिया आणि इतर खतांचा काळाबाजार करणे, बाजारात कृत्रिम टंचाई निर्माण करून चढ्या दराने विक्री करणे, अथवा बनावट नावांनी री-पॅकिंग करून शेतकऱ्यांची फसवणूक करणे, या उद्देशानेच हा साठा गोळा केल्याचा संशय बळावला आहे.
१३ नमुने प्रयोगशाळेत; गोदाम सील
कृषी विभागाच्या भरारी पथकाने या साठ्यातील १२ प्रकारच्या खतांचे १३ संशयास्पद नमुने जप्त केले असून, ते तपासणीसाठी तत्काळ शासकीय प्रयोगशाळेत पाठविण्यात येणार आहेत. हा खतसाठा बनावट आहे का, याची तपासणी केली जाईल. सध्या संपूर्ण गोदाम पंचांसमक्ष सील करण्यात आले आहे.
यांच्यावर गुन्हा दाखल:
या महाघोटाळा प्रकरणी खत निरीक्षक तथा कृषी अधिकारी रवि किसन राठोड यांनी सरकारतर्फे चंदनझिरा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. यावरून:
१. आकाश प्रमोदसिंग बायस (प्रोप्रायटर, जयभारत एग्रो ट्रेडर्स, जालना)
२. अनिल बाळाप्रसाद मंत्री ( , नांदेड)
व इतर अज्ञात व्यक्तींविरोधात खत नियंत्रण आदेश १९८५, अत्यावश्यक वस्तू कायदा आणि भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
कृषी विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन:
खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कोणत्याही बोगस किंवा अनधिकृत खतांची विक्री जिल्ह्यात खपवून घेतली जाणार नाही. शेतकऱ्यांनी खत खरेदी करताना केवळ अधिकृत परवानाधारक विक्रेत्यांकडूनच खरेदी करावी आणि खरेदीचे पक्के बिल आवर्जून मागावे. काही संशय आल्यास तात्काळ कृषी विभागाशी संपर्क साधावा.

## ३ ब्रँच मॅनेजर ...

आला. या जबाबात समोर आलेल्या नव्या आर्थिक हिशोबांनुसार, आरोपींनी बँकेतून कर्ज घेऊन केलेल्या एकूण अपहाराची आणि फसवणुकीची रक्कम आता वाढून तब्बल ५३,२४,४९,८४९/- रुपये (५३ कोटी २४ लाख) एवढी झाली आहे.
घोटाळा उघडकीस आल्यानंतर ज्या सर्वसामान्य ठेवीदारांच्या कष्टाच्या ठेवी या बँकेत अडकून पडल्या आहेत, त्यांनी आपल्या रकमा परत मिळवण्यासाठी आर्थिक गुन्हे शाखेकडे () लेखी तक्रारी अर्ज सादर करण्यास मोठी गर्दी केली आहे.
१५ मे रोजी या तीन वरिष्ठ बँक अधिकाऱ्यांना अटक
गुन्ह्यात सक्रिय सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने शोध मोहीम राबवून १५ मे २०२६ रोजी सायंकाळी १९:२० वाजता खालील तीन बँक अधिकाऱ्यांना ताब्यात घेऊन अटक केली:
१. विकास दिनेश शर्मा (वय ३७ वर्षे, रा. मोदीखाना, जालना): शाखा अधिकारी, जालना मर्चंट को-ऑप बँक, शाखा- देऊळगाव राजा (जि. बुलढाणा).
२. सचिन सुरेशराव भालेराव (वय ५० वर्षे, रा. मंमादेवी नगर, अंबड रोड, जालना): पासिंग अधिकारी, जालना मर्चंट को-ऑप बँक, शाखा- नवीन मोंढा, जालना.
३. गोपाल भगवानराव शिंदे (वय ४१ वर्षे, रा. रॉयल नगर, नवीन मोंढ्या जवळ, जालना): शाखा अधिकारी, जालना मर्चंट को-ऑप बँक, शाखा- सिल्लोड (जि. छत्रपती संभाजीनगर).
या तिन्ही आरोपींना आज जिल्हा व सत्र न्यायालय तथा विशेष एमपीआयडी () न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने गुन्ह्याच्या सखोल तपासासाठी तिघांनाही तीन दिवसांची पोलीस कोठडी () मंजूर केली आहे.
गुन्ह्यात यापूर्वीच गजाआड झालेले आरोपी:
या महाघोटाळ्यात पोलिसांनी यापूर्वीच मुख्य सूत्रधारासह खालील ९ आरोपींना अटक केली आहे, ज्यांची सध्या कसून चौकशी सुरू आहे:
१. रायचंद सखाराम कुरंगळ (घोटाळ्याचा मुख्य सूत्रधार)
२. निलेश्वर शेषराव भोसले (सहकारी)
३. रामेश्वर विलासराव जाधव (सहकारी)
४. ज्ञानेश्वर विलासराव जाधव (सहकारी)
५. सुधाकर रावसाहेब ठोंबरे (सहकारी)
६. गणेश रमेश साबळे (मुख्य सूत्रधार कुरंगळ याचा मॅनेजर)
७. प्रविण पाडुरंग पुरी (सहकारी)
८. राजेंद्र भिकचंद टोकशा (महाव्यवस्थापक - जनरल मॅनेजर, जालना मर्चंट बँक)
९. नटवर सत्यनारायणजी दायमा (शाखा अधिकारी, जालना मर्चंट बँक, शाखा- भोकरदन)
या पोलीस पथकाने बजावली कामगिरी:
सदरची अत्यंत संवेदनशील आणि मोठी कारवाई जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मा. श्री. तेगबीर सिंह संधू साहेब यांच्या थेट मार्गदर्शनाखाली, आर्थिक गुन्हे शाखेचे प्रभारी पोलीस उपअधीक्षक श्री. सुरेश उनवणे, सहायक पोलीस निरीक्षक श्री. मिथुन घुगे, पोलीस उपनिरीक्षक शैलेश म्हस्के आणि पोलीस अंमलदार गोकुळसिंग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, विष्णू कोरडे, ज्ञानेश्वर खुने व श्रेयस वाघमारे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.
आर्थिक गुन्हे शाखेकडून सध्या अटक आरोपींकडे पैशांच्या देवाणघेवाणीबाबत कसून तपास सुरू असून, या घोटाळ्यात सहभागी असलेल्या इतरही अनेक निष्पन्न आरोपींचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे. त्यामुळे आगामी काळात आणखी काही बडे मासे पोलिसांच्या गळाला लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## जालन्यात ऑनलाईन ...

संशयास्पद फिरणाऱ्या त्या तरुणाभोवती वेढा घातला आणि त्याला पळून जाण्याची संधी न देता जागीच झडप घालून ताब्यात घेतले.
पोलिसांनी जेव्हा त्या संशयित युवकाची अंगझडती घेतली, तेव्हा पोलिसांनाही धक्का बसला. त्याने आपल्या शर्टच्या मागील बाजूस शरीराला लावून एक धारदार लोखंडी तलवार, काळ्या रंगाचा अत्यंत घातक आणि धारदार खंजीर तसेच लाकडी मूठ असलेला एक मोठा चाकू लपवून ठेवला होता. पोलिसांनी हे तिन्ही प्राणघातक हत्यारे तात्काळ जप्त केली.
ऑनलाईन मागवली होती तलवार; तरुणाचे नाव उघड
पोलिसी खाक्या दाखवताच संशयित आरोपीने आपली गुन्हेगारी कबुली दिली. पोलिसांनी चौकशी केली असता, त्याचे नाव यश संतोष जाधव (वय १८ वर्षे, राहणार: शिवनगर, जुना जालना) असल्याचे समोर आले.
विशेष आणि अत्यंत चिंतेची बाब म्हणजे, ही घातक तलवार त्याने कोणत्याही दुकानातून न घेता, ऑनलाईन पद्धतीने (- ) ऑर्डर करून मागवली असल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. इंटरनेट आणि ऑनलाईन डिलिव्हरीचा वापर करून तरुण मुले अशा प्रकारे शस्त्रे मागवत असल्याचा हा धक्कादायक प्रकार समोर आल्याने खळबळ उडाली आहे.
भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल; पोलिसांचा इशारा
विनापरवाना आणि बेकायदेशीरपणे शहरात धारदार व प्राणघातक शस्त्रे बाळगणे, नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणे या गंभीर गुन्ह्याखाली आरोपी यश जाधव याच्याविरुद्ध कदीम जालना पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा ( ) आणि इतर संबंधित कायदेशीर कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
वरिष्ठांचे मार्गदर्शन व पोलीस पथक:
सदरची यशस्वी आणि धडक कारवाई जालना जिल्ह्याचे माननीय पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी () श्री. कुलकर्णी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. जनार्धन शेवाळे यांच्या थेट नेतृत्वात करण्यात आली. या कारवाईत प्रत्यक्ष मैदानात पोहेकॉ/सदा राठोड, पोहेकॉ/सचिन चौधरी, पोना/बाबा गायकवाड, पोना/मतीन शेख आणि पोकॉ/इम्रान खान यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या गुन्ह्याचा पुढील सखोल तपास पोहेकॉ सदा राठोड हे करत आहेत. ''शहरात अशा प्रकारे शस्त्रांचे प्रदर्शन करणाऱ्या किंवा बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्यांची गय केली जाणार नाही,'' असा कडक इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

# डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अभ्यासिका व सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन उत्साहात संपन्न

**बदनापूर । प्रतिनिधी -** तालुक्यातील निकळक येथे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अभ्यासिका व सार्वजनिक वाचनालयाचा उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारिया यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी बोलताना भाऊसाहेब घुगे यांनी बदनापूर तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये अभ्यासिका, वाचनालय आणि व्यायामशाळा उभारण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. निकळक येथील अभ्यासिका व वाचनालयासाठी नाथ फाउंडेशनच्या माध्यमातून आर्थिक मदत करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

युवकांमध्ये दिसून येणारे शिक्षणावरील प्रेम, अभ्यासाप्रती असलेली तळमळ आणि इच्छाशक्ती पाहून या अभ्यासिकेच्या माध्यमातून दरवर्षी अनेक विद्यार्थी शासकीय सेवेत यश मिळवतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारिया यांनी त्यांच्या स्पर्धा परीक्षा तयारीचा प्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडला. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्यांनी आयएएस पदापर्यंतचा प्रवास कसा पूर्ण केला, याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री बद्री पठाडे, श्री परमेश्वर नाईकवाडे, श्री धर्मराज गुंडे, श्री भगवान सावंत, राव पटेल, शेख मुनीर यांच्यासह सरपंच संतोष नागवे, सरपंच लिंबाजी कोल्हे, सरपंच राजीव ढाकणे, सरपंच महादू गीते यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

तसेच बदनापूर पोलीस स्टेशनचे पीआय टी. एम. सुराशे, पीएसआय संतोष सावंत, उपसभापती संजय जगदाळे, राधाकिसन औताडे, बदनापूरचे गटशिक्षणाधिकारी गजानन वाळके, ग्रामसेवक विष्णू चापाईतकर, मुख्याध्यापक फुलचंद पिंपराळे, शिक्षक श्री मुंडे व श्री मस्के यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बदनापूर पोलीस स्टेशनचे पीआय टी. एम. सुराशे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविले. अभ्यासाबरोबरच शरीर तंदुरुस्त असणे आवश्यक असून व्यायामाचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले. कोणतेही उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रत्येकाच्या मनामध्ये जिद्द आणि चिकाटी असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास गावातील सरपंच विलास सावंत, ग्रामपंचायत सदस्य,



मुख्याध्यापक पिंपराळे सर, शालेय समिती अध्यक्ष बंडू जावळे, चेअरमन फैजल चाऊस, कॅप्टन राधाकिसन औताडे, शालेय समिती उर्दू विभागाचे झाकेर शेख, बबनराव शिंदे, भगवान सावंत, रऊफ पटेल, सद्दाम कुरेशी, योगेश शेळके (आर्मी), विठ्ठल जावळे (आर्मी), अस्लम शेख, मुनीर कुरेशी तसेच तरुण सहकारी व गावातील ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वाचनालयाच्या उभारणीसाठी वाचनालय समितीचे सदस्य पांडुरंग शिंदे, आकाश कदम, शुभम शेलार, ऋषी डेरे, अर्जुन शिंदे, हरिकृष्ण औताडे, गणेश गोळे, राजेंद्र गवारे, तनमय गवारे, शुभम शिंदे, प्रतीक गंभीरे, श्रीकांत चव्हाण, आदित्य दाभाडे, अब्दुल सय्यद, दानीश पटेल, राहुल रसाळ, विशाल गोळे, साहील पटेल, आदील पटेल, श्रद्धा दगडघाटे, रामभाऊ इंगळे, गणेश इंगळे, सचिन सपकाळ, गौरव गोळे, गौरव जगताब, विकास सुरासे, विशाल शिंदे, शंकर शिंदे, महेश शिंदे, विठ्ठल शिंदे, उद्धव शिंदे, बाबासाहेब नरवडे, भगवान सुरासे, वैभव गोळे, गणेश पदार, शुभम साबळे, राम नरवडे, श्रीराम नरवडे, मारोती गोळे, विकास नरवडे, करण कदम, सोपान माने, गणेश वाघ, योगेश साबळे, अमोल इंगळे, ज्ञानेश्वर डेरे, संभाजी सुरासे, राहुल डेरे, सचिन इंगळे, शनी शिंदे व अनिल सावंत यांनी विशेष परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय डेंगू डे निमित्त रॅली द्वारे जनजागृती




**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रीय डेंग्यु दिनानिमित्त जिल्हा हिवताप कार्यालयामार्फत रॅली काढण्यात आली. तसेच विविध जागृतीपर उपक्रम राबवुन या वेळी डेंग्यु रोग नियंत्रणाबाबत डॉ.जी.डी. म्हस्के अतिरीक्त जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा हिवताप अधिकारी,जालना,डॉ. राजेंद्र गाडेकर सहाय्यक जिल्हा शल्यचिकित्सक,सामान्य रुग्णालय,जालना, यांनी परिचारीका,आशा स्वयमंसेविका उपस्थित होते. नागरीकांना कीटकजन्य डेंग्यु रोग नियंत्रण व प्रतिबंधात्मक उपययोजना बाबत मार्गदर्शन डॉ. राजेंद्र गाडेकर व डॉ.जी डी म्हस्के यांनी मार्गदर्शन केले. यावर्षीचे घोषवाक्य डेंग्यु नियंत्रणासाठी लोकसहभागः साठलेल्या पाणीसाठयांची तपासणी करा,स्वच्छता राखा ती भांडी झाकुन ठेवा'असे आहे. तसेच डेंग्यु रोग प्रतिबंधात्मक उपाययोजना व नियंत्रणाकरीता आरोग्य प्रदर्शनाचे उद् घाटन सहाय्यक जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.राजेंद्र गाडेकर सर यांच्या हस्ते करण्यात आले. अतिरीक्त जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा हिवताप अधिकारी,जालना डॉ.जी.डी.म्हस्के यांनी यावेळी परिसर स्वच्छता तसेच वैयक्तीकरीत्या करावयाच्या उपाययोजना,खिडक्यांना डास प्रतिबंधक जाळी बसविणे,सांडपाण्याची डबकी वाहती करणे,आठवडयातुन एक दिवस कोरडा दिवस पाळणे,झोपतांना मच्छरदाणीचा वापर करणे,आदी उपाययोजनांची माहिती देऊन डेंग्यु रोगाच्या वाढीस कारणीभुत ठरणाऱ्या एडीस डासांच्या अळया नष्ट करणारे गप्पीमासे दाखवुन डेंग्यु आजार लक्षणे, उच्च ताप, डोकेदुखी, अंगावर पुरळ येणे, असे डेंग्युची लक्षणे दिसताक्षणी मोफत शासकिय रुग्णालयात तपासणीचे आवाहन केले. शासकिय रुग्णालयात मोफत रोगनिदान व औषधोपचार उपलब्ध आहे. या उपक्रम यशस्वी करण्याकरीता श्री.एस.व्ही. वाडेकर सहा.जिल्हा हिवताप अधिकारी, श्री.व्ही. एस.गवळी, श्री.पी.एस.बावणे, श्री.जी.एम. देशपांडे, श्री.पी.एस.पवार (आरोग्य निरिक्षक), श्री.नितिन सोनकर, श्री.किरण काळे, सौरभ मुंढे (प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी) तसेच किटकसमाहारक, वाहन चालक, जालना शहरातील सर्व आरोग्य कर्मचारी व कार्यालयाचे क्षेत्र कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# खरीप पिक शेतकऱ्यांसाठी हवामान अंदाज मेळाव्याचे आयोजन

**देवलाल आकोदे**

**हसनाबाद -** भोकरदन तालुक्यातील हसनाबाद येथे हसनाबाद व परिसरातील शेतकऱ्यांसाठी खरीप हंगामातील पिकांच्या खबरदारी व उपायांसाठी हवामानात अंदाज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.हसनाबाद येथील त्रिमूर्ती कृषी सेवा केंद्र व प्रवर्धन सीड्स प्रायव्हेट लिमिटेड हैदराबाद यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दिनांक २० मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजता हसनाबाद पोलीस स्टेशन समोरील रोड लगतच्या जागेवर शेतकऱ्यांसाठी या मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून,या मेळाव्यामध्ये हवामान अंदाज विश्लेषक श्री तोडकर साहेब हे हवामान विषयक व शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील पिकांसाठी घ्यावयाची खबरदारी व निगडित विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत.या मेळाव्यासाठी तालुका व परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक श्री ज्ञानेश्वर साबळे त्रिमूर्ती कृषी सेवा केंद्र यांनी केले आहे.यापूर्वी




समाजसेवा म्हणून संबंधितांनी शेतकरी मेळावे घेऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केलेले आहे तसेच गावातील शाळेस टेबल व इतर शैक्षणिक साहित्य वितरीत केलेले आहे.

# जालना मनपाची धडक कारवाई; भोकरदन नाका आणि अंबड चौफुली परिसरातील १८ अतिक्रमणे जमीनदोस्त

## आज अखेर १६६ अतिक्रमणे निष्कासित; दोन स्वतंत्र पथकांमार्फत मोहीम फत्ते

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर अतिक्रमणमुक्त करण्यासाठी जालना शहर महानगरपालिका प्रशासनाने आता कंबर कसली आहे. मनपा आयुक्त श्रीमती अंजली शर्मा यांच्या आदेशानुसार आज, शनिवारी (दि. १६) शहरात विशेष अतिक्रमण हटाव मोहीम राबवून आणखी १८ अतिक्रमणे हटवण्यात आली. यामध्ये भोकरदन नाका परिसरातील दुकानांचे शेड, पायऱ्या आणि अंबड चौफुली परिसरातील अनधिकृत मांसविक्रीच्या दुकानांचा समावेश आहे. या धडक कारवाईमुळे आजअखेर शहरातील एकूण १६६ अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली आहेत.

शहरातील वाहतुकीला अडथळा ठरणारी आणि नाल्यांवर केलेली अतिक्रमणे हटवण्यासाठी मनपाने दोन स्वतंत्र पथके तैनात केली होती. पोलीस प्रशासनाच्या चोख बंदोबस्तात ही कारवाई कोणताही अनुचित प्रकार न घडता शांततेत पार पडली.

पथक १: भोकरदन नाक्यात नाल्यांवरील बांधकामे हटविली

पहिल्या पथकाने भोकरदन नाका परिसरातील गादिया हॉस्पिटलजवळ आणि कांबळे गल्ली भागात धडक कारवाई केली. या भागात रस्त्यावर आलेले सिमेंटचे ढापे, पायऱ्या, दुकानांवरील पत्रे आणि शेड अशी एकूण १३ अतिक्रमणे काढण्यात आली. विशेष म्हणजे नाल्यांवरील अनधिकृत फरशा, पायऱ्या आणि भूमिगत गटारांवरील अडथळे दूर करून सांडपाण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला.

या कारवाईत अतिक्रमण विभाग प्रमुख बी. सी. राठोड, सहाय्यक सॅमसन कसबे, मॅथ्यू वर्गीस चाको, स्वच्छता निरीक्षक अजय पेम्बर्ती, शेख कादर, आमेर खान, हरिशचंद्र लोखंडे, उत्तम लाडाने आणि १५ सफाई कर्मचारी सहभागी झाले होते.

पथक २: ५ अवैध मांसविक्रीची दुकाने हटविली

दुसऱ्या पथकाने अंबड चौफुली ते इंदेवाडी पाण्याच्या टाकीपर्यंतच्या रस्त्यावरील ५ मांसविक्रेत्यांची अतिक्रमित दुकाने हटवून रस्ता मोकळा केला. या कारवाईत सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर, मांसविक्रेता प्रतिबंध तथा स्वच्छता निरीक्षक अमजद खान, स्वच्छता निरीक्षक शोएब खान, अरुण वानखेडे आणि कर्मचारी श्रावण सराटे यांनी सहभाग घेतला.

''दि. १५ मे पर्यंत शहरातील एकूण १४८ अतिक्रमणे हटविण्यात आली होती. आज त्यात आणखी १८ अतिक्रमणांची भर पडल्याने आतापर्यंत एकूण १६६ अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली आहेत. शहरातील अतिक्रमणे हटविण्याची ही मोहीम यापुढेही अशीच नियमितपणे सुरू राहणार आहे. त्यामुळे संबंधित अतिक्रमणधारकांनी मनपाच्या कारवाईची वाट न पाहता स्वतःहून आपली अतिक्रमणे काढून घ्यावीत आणि प्रशासनाला सहकार्य करावे.'' श्री. विजय फुलंब्रीकर (सहाय्यक आयुक्त , जालना मनपा)

## भाजपा जालना महानगर व जालना ग्रामीण जिल्हा प्रशिक्षण वर्गाचे भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्रजी चव्हाण यांच्या हस्ते उदघाटन

# भाजपा मुळे माझी महाराष्ट्राभर ओळख - भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण; कार्यकर्त्यांच्या मेहनतीमुळे भाजपा जगातील नंबर वन पक्ष - रावसाहेब पाटील दानवे

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टीच्या ''पंडित दीनदयाळ उपाध्याय महाप्रशिक्षण अभियान'' २०२६ अंतर्गत भाजपा जालना महानगर व जालना ग्रामीण जिल्ह्याच्या निवासी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन दि. १६ मे २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील ग्रीन व्हॅली रिसॉर्ट येथे करण्यात आले होते.

या निवासी प्रशिक्षण वर्गाचे उदघाटन भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्रजी चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाजपा माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, खा.रामराव वडकुते, डॉ.भागवत कराड, आ.बबनराव लोणीकर, प्रदेश महामंत्री सुनील राणे, जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, आ.संतोष पाटील दानवे, माजी आ.कैलासजी गोरंटयाल, विलास बापू खरात, संजय केनेकर, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, किशोर शितोळे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, सुरेश केसापुरकर, विलास आण्णा दहिभाते यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण म्हणाले की, भारतीय जनता पार्टी ही विचारधारेवर चालणारी पक्षसंघटना असून प्रत्येक कार्यकर्ता प्रशिक्षित व पक्षनिष्ठ असणे आवश्यक आहे. बूथस्तरावर कार्यकर्त्यांनी पक्ष वाढीसाठी सातत्याने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. भाजपाच्या वाढत्या संघटनशक्तीचा उल्लेख करताना त्यांनी ''भाजपा हा आता हत्तीप्रमाणे मजबूत पक्ष झाला असून तो ज्या मार्गाने चालतो, त्या मार्गावर इतरांना जागा द्यावी लागते,'' असे प्रतिपादन केले. आज भाजपा हा देशातीलच नव्हे तर जगातील सर्वात मोठा पक्ष बनला असून विविध निवडणुकांमध्ये भाजपाला मिळणारे यश हे कार्यकर्त्यांच्या मेहनतीचे फलित असल्याचे त्यांनी सांगितले. लोकप्रतिनिधी म्हणून मिळालेली ओळख ही पक्षामुळेच असल्याचे नमूद करताना रविंद्र चव्हाण म्हणाले की, ''आपली ओळख ही व्यक्ती म्हणून नसून भारतीय जनता पार्टीमुळे आहे.'' प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या घरावर, वाहनावर कमळ चिन्ह लावावे तसेच सर्वसामान्य नागरिकांना पक्षाशी जोडण्याचे काम करावे, असेही त्यांनी सांगितले. मन की बात कार्यक्रम प्रत्येक बूथवर नियमित आयोजित करण्याचे आवाहन करत त्यांनी निवडणुकांमध्ये शंभर टक्के मतदानासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावे, महिन्यातील शेवटचा रविवार हा पक्षकार्याला द्यावा तसेच एसआयआरसाठी पदाधिकाऱ्यांनी गतिमान पद्धतीने काम करावे, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली देश व महाराष्ट्र अधिक सक्षम करण्यासाठी भाजपाच्या प्रत्येक

पदाधिकाऱ्याने बूथस्तरावर सक्रियपणे काम करण्याची गरज असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले असेही ते म्हणाले.



प्रशिक्षण वर्गाच्या उदघाटन सत्रात माजी मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी मार्गदर्शन करताना संघटन मजबुती, बूथस्तरावरील कामकाज आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांनी अधिक जोमाने काम करण्याचे आवाहन केले. तसेच पक्षाचा इतिहास व विकास या विषयावर मार्गदर्शन केले.

यावेळी विविध विषयांवर विचार मांडले यामध्ये कार्यकर्ता विकास, सांभाळ आणि दायित्व बोध, देशापुढील आव्हाने आणि त्यावरील उपाययोजना, स्थायी कार्यक्रम, बूथ व्यवस्थापन, 'मन की बात व आयटी विभागाच्या कार्यपद्धती, पक्षाची कार्यपद्धती, विचार परिवारावर, वैचारिक अधिष्ठान, प्रत्यक्ष कार्यानुभव, मोदी सरकारच्या गरीब कल्याणकारी योजना व शेवटी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते.

या निवासी प्रशिक्षण वर्गामुळे कार्यकर्त्यांना संवाद साधण्याची, वैचारिक देवाणघेवाण करण्याची तसेच पक्ष संघटना अधिक बळकट करण्याची संधी मिळाली. यावेळी भाजपा जिल्हा पदाधिकारी, मंडळ अध्यक्ष, नगरसेवक, मोर्चे व आघाड्यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चंदनझीऱ्यातील ममता नगरमध्ये तीन महीन्यांपासून नळातून ‘गटारमिश्रित’ पाणी?

## फुटलेल्या पाईपलाईनकडे मनपाचे दुर्लक्ष; नागरिकांच्या आरोग्याशी जीवघेणा खेळ; ‘‘महानगरपालिका नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आहे की लोकांना आजारी पाडून रुग्णालयात पाठवण्यासाठी?’’; संतप्त नागरीकांचा सवाल

**जालना । प्रतिनिधी -** आज दिनांक १६ शनिवार रोजी दुपारी एक वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना शहरातील चंदनझीरा परिसरातील ममता नगर येथे महानगरपालिकेच्या कथित हलगर्जीपणामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. परिसरातील पाणीपुरवठा पाईपलाईन मागील तीन महिन्यांपासून लिकेज अवस्थेत असून या लिकेजमुळे नाल्यांचे, संडास-बाथरूमचे दूषित पाणी थेट पिण्याच्या पाण्यात मिसळून नागरिकांच्या घरापर्यंत पोहोचत असल्याचा धक्कादायक आरोप स्थानिकांनी केला आहे.



स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, ज्या वेळेस नळाला पाणीपुरवठा सुरू होतो, त्या वेळेस सुरुवातीला अत्यंत दुर्गंधीयुक्त काळेभोर पाणी नळाद्वारे येते. या पाण्यातून तीव्र घाण व दुर्गंधी येत असून हे पाणी नाल्यांचे आणि साचलेल्या सांडपाण्याचे असल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे. फुटलेल्या पाईपलाईनजवळ संडास आणि बाथरूमचे पाणी साचत असून तेच दूषित पाणी लिकेजमधून पाईपलाईनमध्ये मिसळत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे, या गंभीर समस्येबाबत महानगरपालिकेच्या संबंधित कर्मचाऱ्यांना वारंवार माहिती देऊनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे. ‘‘महानगरपालिका नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आहे की लोकांना आजारी पाडून रुग्णालयात पाठवण्यासाठी?’’ असा संतप्त सवाल स्थानिकांनी उपस्थित केला आहे.

ममता नगर परिसरात दूषित पाण्यामुळे साथीच्या आजारांचा धोका वाढला असून लहान मुले, वृद्ध आणि महिलांच्या आरोग्याबाबत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र पाणीपुरवठा विभागाचा एकही अधिकारी व कर्मचारी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देत नसल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे.

दरम्यान, मनपाच्या पाणीपुरवठा सभापतींनी तात्काळ या प्रकरणात लक्ष घालून फुटलेली पाईपलाईन दुरुस्त करावी, तीन महीन्यापासून सुरू असलेला दूषित पाणीपुरवठा बंद करावा अशी मागणी केली आहे. ‘‘वेळीच उपाययोजना न झाल्यास नागरिकांच्या आरोग्यावर मोठा परिणाम होऊ शकतो,’’ असा इशाराही स्थानिकांनी दिला आहे.



# मालीपुरा परिसरात भिक्षेकरी व्यक्तीचा मृतदेह आढळल्याने खळबळ

## ओळख अद्याप पटली नाही; कदीम जालना पोलिसांकडून तपास सुरू..

**जालना । प्रतिनिधी -** आज दिनांक १६ शनिवार रोजी दुपारी १२ वाजता मिळालेल्या माहितीनुसार शहरातील जुना जालना भागातील मालीपुरा



परिसरात अण्णाभाऊ साठे शॉपिंग सेंटरजवळ एका भिक्षेकरी व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. आज सकाळच्या सुमारास नागरिकांना सदर व्यक्ती संशयास्पद अवस्थेत पडलेली दिसून आली. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तात्काळ पोलिसांना कळविले.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर महानगरपालिकेचे स्वच्छता निरीक्षक शोएब खान दिलीप हिवाळे राहुल हिवाळे तसेच कदीम जालना पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला. त्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला.

मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसून मृत्यूचे नेमके कारण समोर आलेले नाही. प्राथमिक माहितीनुसार संबंधित व्यक्ती परिसरात भीक मागून उदरनिर्वाह करत असल्याचे सांगितले जात आहे.

या घटनेमुळे मालीपुरा परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून नागरिकांमध्ये चर्चेला उधाण आले आहे. दरम्यान, मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे काम सुरू असून पुढील तपास कदीम जालना पोलीस करीत आहेत.

# जालना शहरात उद्यापासून ‘विशेष अतिक्रमण हटाव मोहीम’; मनपा प्रशासनाचा कडक कारवाईचा इशारा

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर पूर्णपणे अतिक्रमणमुक्त करण्यासाठी जालना शहर महानगरपालिका प्रशासनाने कंबर कसली आहे. मनपा आयुक्त श्रीमती अंजली शर्मा यांच्या आदेशानुसार सोमवार, दिनांक १८ मे २०२६ रोजी शहरात विशेष अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेसाठी प्रशासनाने दोन स्वतंत्र पथके तयार केली असून, अतिक्रमण न काढल्यास गुन्हे दाखल करण्याचा आणि खर्चाची वसुली करण्याचा इशारा मनपाने दिला आहे.

अशी असणार पथकांची कारवाई:

शहरातील विविध भागांतील अतिक्रमणे एकाच वेळी हटवण्यासाठी मनपाने खालीलप्रमाणे नियोजन केले आहे:

पथक १: मामा चौक ते उडपी हॉटेल परिसरातील सर्व अतिक्रमणे हटवणार.

पथक २: बाजार चौक, भाजीमंडी, जुना जालना ते टट्टूपुरा परिसरातील अतिक्रमणांवर कारवाई करणार.

स्वखुशीने अतिक्रमण काढा, अन्यथा...

संबंधित अतिक्रमणधारकांनी आपली अतिक्रमणे स्वखुशीने तातडीने काढून घ्यावीत, असे आवाहन मनपाने केले आहे. प्रशासनातर्फे अतिक्रमण हटवल्यास त्याचा संपूर्ण खर्च संबंधित अतिक्रमणधारकाकडून वसूल केला जाईल. एवढेच नव्हे तर, संबंधित व्यक्तीविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा देखील नोंदवण्यात येईल, असा कडक इशारा देण्यात आला आहे.

जालना शहरातील मुख्य रस्ते, नाले आणि नाल्यांवरील अतिक्रमणे हटवण्याची ही मोहीम यापुढेही सातत्याने सुरूच राहणार आहे.

# समृद्धी मा. बाळासाहेब ठाकरे याच्या पूर्ण नावाचा उल्लेख नसल्याचा मनसेकडून तीव्र निषेध

**जालना -** मुंबई ते नागपूर दरम्यान उभारण्यात आलेल्या समृद्धी महामार्गाला शासनाने अधिकृतरित्या ‘‘हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग’’ असे नाव दिलेले असतानाही, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी फलकांवर व दिशादर्शक सूचनांवर बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा पूर्ण उल्लेख नसल्याचा आरोप मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांनी केला आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांना दिलेल्या निवेदनात सोळंके यांनी म्हटले आहे की, जालनाछत्रपती संभाजीनगर मार्गावरून समृद्धी महामार्गावर जाणाऱ्या मार्गावरील फलकांवर केवळ ‘‘समृद्धी महामार्ग’’ असा उल्लेख दिसून येतो. मात्र त्या ठिकाणी ‘‘हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे’’ या नावाचा उल्लेख नाही. जालना एक्झिटसह महामार्गावरील अनेक ठिकाणी अशाच प्रकारे पूर्ण नाव टाळण्यात आल्याचे निदर्शनास येत आहे. ही बाब केवळ तांत्रिक चूक नसून महाराष्ट्राच्या अस्मितेशी संबंधित गंभीर विषय असल्याचे सोळंके यांनी नमूद केले आहे. महाराष्ट्रासाठी आयुष्य झोकून देणाऱ्या स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाला जाणीवपूर्वक दुय्यम वागणूक दिली जात आहे का, असा संतप्त सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. राज्य शासनाने अधिकृतपणे महामार्गाला बाळासाहेब ठाकरे यांचे नाव दिले असताना प्रत्यक्ष फलकांवर पूर्ण नाव न वापरणे म्हणजे त्यांच्या स्मृतीचा अवमान असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित विभागाला तात्काळ आदेश देण्यात यावेत, अशी मागणी मनसेच्या वतीने करण्यात आली आहे. मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्गावरील सर्व फलक, दिशादर्शक सूचना व अधिकृत ठिकाणी ‘‘हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग’’ असा संपूर्ण उल्लेख करण्यात यावा, अशी मागणी सोळंके यांनी केली आहे. तसेच ज्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे किंवा हेतुपुरस्सर वर्तनामुळे बाळासाहेब ठाकरे यांचे नाव वगळण्यात आले, त्यांच्यावर चौकशी करून कठोर कारवाई करावी. शासनाच्या अधिकृत आदेशानुसार पूर्ण नाव वापरण्याचे निर्देश असतानाही त्याची अंमलबजावणी का झाली नाही, याचा जाहीर खुलासा करावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.




स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे हे केवळ एका पक्षाचे नेते नव्हते, तर ते महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक होते. त्यांच्या नावाचा सन्मान राखणे ही शासनाची नैतिक जबाबदारी आहे. या गंभीर विषयाकडे शासनाने तात्काळ लक्ष द्यावे, अन्यथा जनतेतून तीव्र संताप निर्माण होण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासनाची राहील, असा इशारा मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांनी दिला आहे.

# परतूरात लॉयन्स क्लब व दृष्टी फाउंडेशनच्या वतीने धनंजय जाधव यांचा सत्कार

**परतूर । प्रतिनिधी -** मध्ये निवड झाल्याबद्दल धनंजय जाधव यांचा दि.१६/०५/२०२६, रोजी लॉयन्स क्लब व दृष्टी फाउंडेशन च्या वतीने सत्कार करण्यात आला. सृष्टी लॉयन्स नेत्रालय येथे हा सत्कार सोहळा पार पडला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मेहनत, जिद्द आणि संघर्षाच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले. वडिलांचे छत्र नसताना आईचे कष्ट, शिक्षकांचे मार्गदर्शन तसेच मित्रांची मोलाची साथ यामुळे धनंजय जाधव यांनी यशाचा हा टप्पा गाठला. त्यांच्या या प्रेरणादायी प्रवासाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. यावेळी पी एम जे एफ लॉयन मनोहर खालापुरे, लॉयन डॉ. ज्ञानेश्वर धुमाळ, लॉयन अमित खालापुरे, लॉयन डॉ. निकिता शिंदे तसेच एमजेएफ लॉयन संजीवनी खालापुरे उपस्थित होते. मान्यवरांनी धनंजय जाधव यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत युवकांनी त्यांच्या संघर्षातून प्रेरणा घ्यावी, असे सांगितले.




लॉयन्स परिवाराकडून अभिनंदन करण्यात आले आहे.

# राज्यस्तरीय सेपाक टाकरा स्पर्धेसाठी निवड चाचणीचे आयोजन

**जालना । प्रतिनीधी -** महाराष्ट्र सेपाक टाकरा असोसिएशनच्या वतीने दिनांक ४ ते ७ जुन २०२६ दरम्यान नागपुर येथे ३६ व्या राज्यस्तरीय सिनीयर व २७ व्या ज्युनीयर सेपाक टाकरा अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२७ चे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर स्पर्धेत सहभागी होण्याकरीता जालना जिल्हा सेपाक टाकरा असोसिएशनच्या वतीने दिनांक १९ मे २०२६, मंगळवार रोजी निवड चाचणीचे आयोजन शिशु विहार इंग्लिश स्कुल, जालना येथे सकाळी १० वाजल्यापासुन करण्यात आलेले आहे.



सदर निवड चाचणीमध्ये सिनीयर गटात सहभागी होणाऱ्या खेळाडुंना वयाचे बंधन नाही तर ज्युनीयर गटात सहभागी होण्यासाठी खेळाडुंची जन्म तारीख ०१/०१/२००८ किंवा त्यानंतरची असावी. निवड चाचणीत सहभागी होण्याकरीता कोणतेही प्रकारचे शुल्क आकारण्यात येणार नाही. सदर निवड चाचणीतुन १५ मुले व १५ मुलींची निवड करण्यात येईल व हे खेळाडु राज्यस्तर स्पर्धेत जालना जिल्ह्याचे प्रतिनीधीत्व करतील. सेपाक टाकरा हा खेळ शालेय स्पर्धांमध्ये सहभागी असुन दहावी व बारावीत असणाऱ्या खेळाडुंना ग्रेस मार्क तथा शासकीय व निमशासकीय नौकरीसाठी आरक्षणास पात्र आहे.

अधिक माहितीकरीता शेख चाँद पी.जे. मो. नं. ९८२२४५६३६६, जिल्हा प्रशिक्षक अमोल काटकर, उमेश खंदारकर, सुभाष पारे, गणेश लांडगे, नागेश वराडे, सुनील हस्तक, शेख रियाज, गोवर्धन वाहुळ, श्रीमती शेख महेजबीन, श्रीमती सुनीता गवई, श्रीमती गिता संगम, श्रीमती करूणा निरेवाड, अमोल सोलाट यांच्याशी संपर्क साधावा. तरी सदर सुवर्ण संधीचा जालना जिल्हयातील खेळाडुंनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा सेपाक टाकरा असोसिएशन जालनाचे अध्यक्ष तथा नगरसेवक अश्वीन अंबेकर, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, देवगिरी विद्या प्रतिष्ठाणचे अध्यक्ष बबन दादा सोरटी, जिईएस कॅम्पसचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पुंगळे पा., माजी नगरसेवक जयंत भोसले, बाला परेदसी, ज्ञानेश्वर ढोबळे, क्रीडा अधिकारी श्रीमती लता लोढें, राज्य क्रीडा मार्गदर्शक सिद्धार्थ कदम, आशीष जोगदंड, क्रीडा अधिकारी श्रीमती आरती चिल्लारे, कृष्णा जंजाळ, वाहेद पटेल, गुलाब राठोड, प्रमोद राठोड, डॉ. शेख रफि क, भागवत कडुळे, सचिन मोहीते जालना जिल्हा सेपाक टाकरा असोसिएशन जालना व जालना जिल्हा ऑलंम्पीक असोसिएशन यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# सोतोकान कराटे डो इंडिया च्या वतीने मान्यता चव्हाण हिचा सत्कार

**परतूर । प्रतिनिधी -** येथील लालबहादूर शास्त्री कन्या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मान्यता जाल्या चव्हाण हिला एस.एस. सी. बोर्ड परिक्षेत ७८.६० टक्के गुण घेत घवघवीत यश मिळविले आहे.त्याबद्दल सोतोकान कराटे डो इंडिया च्या वतीने तीचे कराटे ग्रॅण्ड मास्टर, माणिक जैस्वाल आणि कराटे मास्टर, रोहित जैस्वाल यांनी हार, पेढे वाटून सत्कार करण्यात आला.मान्यता चव्हाण हि कराटे प्रशिक्षण घेत असताना सुद्धा एवढे गुण घेतले तीची जीद्द व स्वताचा विश्वास तीच्या कामी आला आहे.या यशा मुळे ती भविष्यात न थांबता पुढे असेच यश प्राप्त करीत राहिल. या मध्ये तीच्या आई, वडिल व गुरुजनांचा मोठा वाटा आहे.तीच्या आईने कराटे प्रशिक्षण घेने बंद न ठेवता सुरू ठेवले. तीच्या आईचा विश्वास व तीची मेहनत तिला घवघवीत यश मिळवून दिले.मान्यता ने एक आदर्श घडवीला आणि दुसऱ्यांना पण दाखवून दिले




मनातून केलेले कोणत्याही परिस्थितीत आपण यशस्वी होवू शकतो.यावेळी माणिक जैस्वाल यांनी तीच्या पुढील प्रवासाला असीच यशस्वी होवो शुभेच्छा दिल्या. मान्यता आणि तीच्या आईचे सर्व कराटे विद्यार्थी व सोतोकान कराटे डो इंडिया परतूर च्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.